महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

दिनांक:- २१ ऑगस्ट, २०२३

## प्रसिध्दीपत्रक

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रथम वर्ष प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रम रिक्त जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुधारित वेळापत्रक

------

शैक्षणिक वर्ष२०२३-२४ करीता १ वर्ष, २ वर्ष व ४ वर्ष कालावधीच्या प्रमाणपत्र / पदविका अभ्यासक्रम शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विना अनुदानित कला संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रकान्वये " संचालनालयाच्या स्तरावरुन ऑनलाईन स्वरुपात झालेली प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरही प्रवेशाच्या जागा रिक्त असल्यास, दिनांक ९ जून, २०२३ ते १० जुलै, २०२३ या तसेच दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ ते **१८ ऑगस्ट, २०२३ या कालावधित ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांचीच** रिक्त जागांवर शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन गुणवत्तेनुसार सदर विद्यार्थ्यांचीच मुळ कागदपत्र तपासून प्रवेश देण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, कला महाविद्यालय महाराष्ट्र संघ यांच्या दिनांक १० ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार सदर प्रवेश प्रक्रियेकरिता "**दिनांक ३० ऑगस्ट, २०२३**" पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे. कला संस्थांमध्ये रिक्त जागा असल्यास शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन व विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्र तपासून संस्थास्तरावर गुणवत्ता यादी प्रसिध्द करुन प्रवेश देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. संबंधित संस्थांना ऑनलाईन करावयाच्या नोंदणीबाबत सविस्तर माहितीपत्रक http://doaonline.co.in/fineart२३ या लिंकवर प्रसिध्द करण्यात येईल.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (संदीप डोंगरे) | ( राजीव मिश्रा) |
| प्र.निरीक्षक, | कला संचालक, |
| चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई | कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई |